**आरोग्य कार्यालय**

**पुणे महानगरपालिका**

**जाहिरात क्र.१/२८४ दिनांक:-३०-६-२०२६**

**जाहिरात प्रकटन**

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर ६ महिन्यांकरीता करार पध्दतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| क्र. | हुद्दा | एकुण पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकवट मासीक मानधन रुपये | जातींचा गट |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुलाणी (सफाईसेवक) | २५ | इ.४ थी, मुलाणी कामाचा ०१ वर्षाचा अनुभव | रु.२३,७८२/- | ०३- अजा<br>०२ - अज<br>०१ – विजाअ<br>०१ – भजब<br>०१ – भजक<br>०१ – भजड<br>०० – विमाप्र<br>०५ – इमाव<br>०२ – साशैमाप्र<br>०२ – आदुघ<br>०७ – खुला |

<u>अटी :- १. वयोमर्यादा</u> - खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ०५ वर्षाने शिथिल असेल. २. वरील शैक्षणीक पात्रता व अनुभव आवश्यक. ३.सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरुपाचे आहे. ४. अर्ज दाखल करण्यासाठी येणा-या उमेदवारांनी स्व-खर्चाने पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसही हजर राहणे आवश्यक आहे. ५. येताना उमेदवारांनी सोबत एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ६.निवड झालेल्या उमेदवारांना विहीत नमुन्यात करारनामा करुन फक्त ०६ महिन्यांकरीता नेमणूक दिली जाईल. ७. वरील पद हे अस्थायी स्वरुपाचे असल्याने या पदावर कायमस्वरुपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. ८. वरील पदासाठी नियुक्त होणाऱ्या सेवकांना महानगरपालिकेच्या कत्तलखाना या ठिकाणी काम करावयाचे असून सदर कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा.खातेप्रमुख यांना राहील. ९. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १० उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकार मा. खातेप्रमुख यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. ११. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल. १२. निवड झालेल्या उमेदवारास सेवेत रुजू होण्यापूर्वी एक महिन्याचे मानधन अनामत रक्कम म्हणून भरावे लागेल व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

वरीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभवधारक उमेदवारांनी आवश्यक त्या कागदपत्रासह उपरोक्त हुद्द्यासमोर नमुद केलेल्या दिवशी आरोग्य कार्यालय, तिसरा मजला पुणे महानगरपालिका मुख्य इमारत, शिवाजीनगर पुणे ४११००५ येथे दि.०७/७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वेळे अगोदर एक तास नोंदणी करून उपस्थित रहावे. वेळेनंतर आलेल्या उमेदवारांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत,याची नोंद घ्यावी.सदरची जाहिरात ही <u>www.pmc.gov.in</u> या संकेत स्थळावर Recruitment या सदरात उपलब्ध आहे.

उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयामार्फत वरील ठिकाणीच देण्यात येईल .

**(डॉ.निना बोराडे)**

**आरोग्य अधिकारी**

**पुणे महानगरपालिका**